# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

---

जा.क्र-२०२१/बैठक-१५१/(८२)/आ.४ दिनांक :-२२/१०/२०२१

**प्रति,**
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :-** दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५१व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५१व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,
22/10/21

**सोबत : वरीलप्रमाणे**

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत:- माहितीसाठी.**
खाजगी सचिव (मा.मंत्री,पा.पु. व स्व. तथाअध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

...२/-

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद /अमरावती/नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता (मुख्यालय),म.जी.प्रा., मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष - ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५१व्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १५१वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली परिषद सभागृह, क्र.४, ७वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे बुधवार दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) श्री.संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
३) श्री.ओ.पी.गुप्ता, प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
४) श्री.डॉ.हृषीकेश यशोद, सदस्य सचिव म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.राजेंद्र मडके, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.रविंद्र गोरवे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्रभारी), म.जी.प्रा. मुंबई.
३) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.:- १ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५०व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५०वी बैठक दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५०व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** म.जी.प्रा.च्या १५०व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी संपन्न झालेल्या १५०व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४९व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** ७वा वेतन आयोग लागू करण्याबाबत.
दिनांक १/१/२०१६ ते दिनांक ३१/३/२०१७ या कालावधीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगानुसार दिनांक १/१/२०१६ ते दिनांक ३१/३/२०१७ या कालावधीसाठी सुधारीत वेतन संरचना मंजूर करण्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

१) राज्य शासकीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना मंजूर करण्यात आलेली आहे. मात्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या वेतन/भत्त्यांचे दायित्व शासनाने दिनांक २३ मार्च, २०१७ पासून स्वीकारले असल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ मधील कलम ६६ (२) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना दिनांक २३/९/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली असून सदर शासन निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचा-यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ पासून सुधारीत वेतनश्रेणीप्रमाणे वेतन अदा करणे आवश्यक आहे. सबब, त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तातडीने कार्यवाही करुन सुधारीत वेतनश्रेणीप्रमाणे वेळेवर वेतन अदा होईल, याची दक्षता घ्यावी.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १/१/२०१६ ते दिनांक ३१/३/२०१७ या कालावधीसाठी सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना लागू करावयाची झाल्यास त्यास शासनाची परवानगी आवश्यक आहे. सबब, त्याअनुषंगाने तसेच शासनाने दिनांक १/४/२०१७ पासून ७वा वेतन आयोग लागू करण्यास मान्यता दिल्याच्या पार्श्वभुमीवर दिनाक १.४.२०१७ पासून दायित्व शासनाने स्वीकारले असल्यामुळे दिनांक १.१.२०१६ पासून वेतन आयोग लागू करावयाचा झाल्यास आणि त्याअनुषंगाने वेतन निश्चिती करावयाची झाल्यास त्या प्रयोजनार्थ लागणारा अतिरिक्त निधी व त्याचा भार किती येतो, याबाबत तपासणी करुन निश्चित किती खर्च अपेक्षित आहे, याचा तपशिल. त्याचबरोबर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रस्तूत प्रयोजनार्थ निधी शिल्लक आहे किंवा कसे, असल्यास त्याचा तपशिल, याव्यतिरिक्त नमुद कालावधीसाठी ठोक स्वरुपात अनुदान देणे योग्य राहिल कि वेतन श्रेणीनुसार देय फरक देणे योग्य राहिल, त्याअनुषंगाने नियमानुसार उचित तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल आगामी म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाच्या बैठकीत सादर करुन याबाबत पुढील योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ मधील कृती आराखडयातील वर्गवारी २ मधील देवलामेटी पा.पु.यो. जि.नागपूर. वेणा पाणी पुरवठा केंद्रातून देवलामेटी गावास ७० लि. दरडोई प्रतिदिन या निकषानुसार पाणी पुरवठा करण्यास मान्यता मिळण्याबाबत.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ मधील कृती आराखड्यातील वर्गवारी २ मधील समाविष्ट देवलामेटी पाणी पुरवठा योजनेस (जि.नागपूर) वेणा पाणी पुरवठा केंद्रातून ७० ली. दरडोई प्रतिदिन या निकषानुसार पाणी पुरवठा करण्यास मान्यता मिळण्याबाबतच्या प्रस्तावाची माहिती कार्यक्रम बाबीनुसार मा.संचालक मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आली.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ मधील कृती आराखड्यातील वर्गवारी २ मध्ये देवलामेटी पाणी पुरवठा योजनेचा समावेश आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत देवलामेटी पाणी पुरवठा योजनेला ग्रामपंचायतीचा ठराव क्र.१२ दि.२९.१०.२०२० अन्वये मागणी प्राप्त आहे. देवलामेटी गाव पेरीअर्बन घोषित करण्यात आल्यामुळे योजना, ७० ली. दरडोई प्रतिदिन या निकषानुसार आखण्यात आली आहे. देवलामेटी गावाची सन २०३९ मधील संकल्पीत लोकसंख्या ३५७८८ इतकी असून, दररोज ७० ली. दरडोई प्रतिदिन या निकषानुसार पाण्याची मागणी ३.२० दलली प्रतिदिन एवढी येते. आयुध निर्माण खारखान्याची कमी झालेली पाणी मागणी विचारात घेता, अस्तित्वात असलेल्या योजनेची क्षमता सन २०३८ पर्यंत पुरेशी राहील. सर्व उपभोक्ता मिळून सन २०३८ मधील एकूण पाण्याची मागणी २९ द.ल.ली. प्रतिदिन इतकी आहे. यासाठी अस्तित्वात असलेल्या जलशुध्दीकरण केंद्राची ३८.१६ द.ल.ली. क्षमता पुरेशी आहे.

सदर योजनेची अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन शासनास सादर करुन, त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल.

सदर प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ मधील कृती आराखड्यातील वर्गवारी २ मध्ये समावेश असलेल्या देवलामेटी पाणी पुरवठा योजनेस वेणा पाणी पुरवठा केंद्रातून देवलामेटी गावास ७० ली. दरडोई प्रतिदिन या निकषानुसार पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवालास शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. याबाबत पुढील कार्यवाही करण्याकरिता मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** म.जी.प्रा.च्या मालकीची नागपूर पेरीअर्बन प्रा.पा.पु.योजना ता. व जि.नागपूर तरोडी बु. या गावाचा योजनेत समावेश करण्यासंबंधीची कार्यक्रम बाब.

म.जी.प्रा.च्या मालकीची नागपूर पेरीअर्बन प्रा.पा.पु. योजना ता. व जि.नागपूर या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून तरोडी बु. या गावाचा योजनेत समावेश करण्यासंबंधीच्या प्रस्तावाची माहिती कार्यक्रम बाबीनुसार मा.संचालक मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आली.

तरोडी बु. हे गाव सुध्दा नागपूर शहरालगत असून, पेरीअर्बन योजनेच्या कापसी खु. ला जाणाऱ्या गुरुत्ववाहिनीच्या मार्गावर आहे. त्यामुळे नागपूर पेरीअर्बन योजनेतून पाणी पुरवठा मिळण्याबाबत या गावाने मागणी केलेली आहे. सदर गावाची संकल्पीत पाण्याची मागणी ०.१३ द.ल.लि.प्रतिदिन इतकी आहे. सदर गावाच्या ग्रामपंचायतीने ठोक तत्वावर ५०,००० ली. प्रतिदिन पाणी मागणी नागपूर पेरीअर्बन योजनेतून मिळण्याबाबत दि.१५.७.२०२१ रोजीच्या पत्राव्दारे केलेली आहे. उर्वरित पाण्याची मागणी अस्त्विवत्वातील स्त्रोतांतून सदर गावास उपलब्ध होणार आहे. सदर गाव जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ च्या कृती आराखड्यात अंतर्भूत करण्यात आलेले आहे.

बिडगाव व तरोडी खु. ही गावे सुध्दा नागपूर शहरालगत असून, पेरीअर्बन योजनेच्या मुख्य संतुलन टाकी ते विविध गावांच्या जलकुंभांपर्यंत टाकण्यात आलेल्या गुरुत्वाहिनीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे नागपूर पेरीअर्बन योजनेतून पाणीपुरवठा मिळण्याबाबत या गावांनी मागणी केली आहे.

महानगर प्रदेश विकास प्राधिकरण/नागपूर सुधार प्रन्यास यांनी त्यांच्यासाठी मंजूर २५.५३ द.ल.लि. प्रतिदिन पाण्याच्या मागणीतून, बिडगाव व तरोडी खु. या गावांना लागणारे २.१५ द.ल.लि. प्रतिदिन एवढे पाणी, योजनेच्या १५ वर्षाच्या संकल्पन कालावधीपर्यंत उपलब्ध करुन देण्यास हरकत नसल्याबाबत त्यांच्या दि.२६.७.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे. या गावाचा समावेश केल्याने नागपूर पेरीअर्बन प्रा.पा.पु. योजनेच्या वार्षिक पाणीपट्टीतून देखभाल व दुरुस्तीचा खर्च वजा जाता योजनेतून म.जी.प्रा.ला महसूली उत्पन्न प्राप्त होणे अपेक्षित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ मधील कृती आराखड्यात समावेश असलेल्या तरोडी बु. पाणी पुरवठा योजनेस नागपूर पेरीअर्बन व १० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा करण्यास मा. संचालक मंडळ मान्यता देत आहे. सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवालास शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. याबाबत पुढील कार्यवाही करण्याकरिता मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** म.जी.प्रा.च्या कार्यावर आधारित समग्र पुस्तक तयार करण्याच्या प्रक्रियेस म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

मजीप्राच्या कार्यावर आधारित समग्र पुस्तक तयार करण्याच्या प्रक्रियेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावाची माहिती कार्यक्रम बाबीनुसार मा.संचालक मंडळाच्या बैठकीसमोर सादर करण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रदीर्घ इतिहासासह महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून आजवरच्या पाणीपुरवठा व मलनिःस्सारण योजनांचे सुबक स्वरूपातील दस्तावेजीकरण झालेले नाही. मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा आढावा घेत असताना म.जी.प्रा.ने आतापर्यंत केलेल्या निवडक कामांचा समावेश करुन समग्र पुस्तकाचे प्रकाशन करावे अशी कल्पना मांडली.

सदर पुस्तक स्वरूपातील दस्तावेजीकरण महाराष्ट्र शासनाच्या इतर विभाग जसे जलसंपदा विभाग, आरोग्य विभाग, शेती विभाग इत्यादी विभागामार्फत करण्यात आले असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सुबक स्वरूपातील दस्तावेजीकरण केल्यास ते पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

ठरेल. त्यानुसार म.जी.प्रा.च्या कार्याबाबतचे समग्र पुस्तक तयार करण्याची कार्यवाही दि.१५.३.२०२१ पासून सुरु करण्यात आली. या कामासाठी दोन दरपत्रके अंदाजे एकूण रु.२०.०० लक्ष इतक्या रक्कमेच्या मर्यादेपर्यंत मागविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

या कामासाठी दरपत्रके मागविण्यास मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी मान्यता प्रदान केल्यानुसार अनुभवी मुद्रक-प्रकाशकांकडून शासन निर्णय दि.७.५.२०२१ अन्वये दरपत्रके मागविण्यात आली. प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यापैकी कमीतकमी दरांना मा. सदस्य सचिव यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर याबाबत देयक तयार करुन त्याच्या अदायगीच्या पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आले. याबाबत रु.२०.०० लक्ष इतका निधी मजीप्राच्या स्व:निधीतून उपलब्ध करुन देण्यास विनंती करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा होऊन, समग्र पुस्तक तयार करण्याच्या बाबतीत दोन दरपत्रके मागवून यापोटी एकूण रु.२०.०० लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्व:निधीतून खर्च करण्याच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे समग्र पुस्तक तयार करण्याच्या बाबतीत दोन दरपत्रके मागवून यापोटी एकूण रु.२०.०० लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्व:निधीतून खर्च करण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे. सदर कार्यवाही करण्याकरिता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.